सकाळ

# संशोधन आणि नावीन्याची कास!

सकाळ ज्ञानवाटा

'विकसित भारत' करण्याच्या प्रवासात शिक्षण संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. देशात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' लागू होणे, हे याच प्रवासातील एक महत्त्वाचे पाऊल. यामुळे शिक्षणात होणारे नवे बदल, रुंदावणाऱ्या अध्यापन आणि अध्ययन क्षमता, कौशल्यप्रधान अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देईल. या सर्व प्रक्रियेत शिक्षण संस्था कशा पद्धतीने पावले टाकत आहेत, हे जाणून घेण्यासाठी 'सकाळ'ने 'ज्ञानवाटा' हे सदर सुरू केले आहे. शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद साधून त्यांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न या सदरातून केला जाणार आहे. या सदराची सुरुवात विश्वकर्मा विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अगरवाल आणि कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे यांची मते जाणून करण्यात आली आहे. शिक्षणविषयक विविध विषयांवर या दोन्ही तज्ज्ञांनी आपली मते मांडली आहेत.

## कौशल्यावर आधारित शिक्षणावर भर

गेल्या काही वर्षांत शिक्षणाच्या पद्धतीत आमुलाग्र बदल झाले असून, ते सकारात्मक आहेत. केंद्र सरकारचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वागतार्ह आहे. उद्योग आणि शिक्षणातील दरी कमी करण्याच्या दृष्टीने हे धोरण निश्चितच उपयुक्त ठरेल. उदाहरण द्यायचे झाले, तर यापूर्वी प्रामुख्याने व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या १०० पैकी पाच विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना उद्योगांत अनुभव घेण्याची संधी मिळत असे. परंतु आता व्यावसायिक शिक्षणासह अन्य पारंपरिक शिक्षण घेणाऱ्या १०० टक्के विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण मिळू शकणार आहे.



भरत अगरवाल

## नव्या आयामातून विचार व्हावा

शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकासाबरोबरच सहानुभूती, करुणा, भावनिक विकास, लवचिकता, आनंदीवृत्ती जागृत होणे, हे शिक्षणाचे मुख्य ध्येय असले पाहिजे. शिक्षणात होणारे नवे बदल स्वीकारताना त्या दृष्टीने प्रयत्न होण्याला अधिक महत्त्व आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यात शिक्षण संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यात शिक्षण संस्थांची गुणवत्ता टिकून ठेवणे आणि त्याचबरोबर ती उंचाविणे यासाठी प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.

जगभरात शैक्षणिकदृष्ट्या झपाट्याने बदल होत आहेत. या बदलांचा वेग साधण्यासाठी भारतातील शिक्षण संस्थांनी चौकटीबाहेर जात नव्या आयामातून विचार केला पाहिजे.



डॉ. सिद्धार्थ जवडे

## काळानुरूप बदल करावे लागतील

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अद्ययावत कौशल्ये, अभ्यासक्रम राबविण्यावर भर दिला आहे. त्याचाच उपयोग करत किमान खासगी शिक्षण संस्थांनी काळानुरूप अभ्यासक्रमात बदल करणे, गरजा ओळखून विद्यार्थ्यांना कौशल्यांवर आधारित प्रशिक्षण देणे, उद्योगांमध्ये इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून देणे यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. शिक्षण संस्थांनी चांगला सुजाण नागरिक आणि देशाला एक पाऊल पुढे घेऊन जाण्याचा विचार करणारी पिढी घडविण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत. विश्वकर्मा विद्यापीठात सध्या २० हजार विद्यार्थी उच्चशिक्षण, तर १० हजार विद्यार्थी शालेय शिक्षण घेत आहेत. पुढील तीन वर्षांत उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३० हजार, शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १५ हजारांपर्यंत नेण्यासाठी प्रयत्न केला जाईल. शिक्षणातून 'उच्चदर्जाची प्रतिभा' असणारे विद्यार्थी घडविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

## 'जागतिक'पेक्षा दर्जेदार शिक्षणाला प्राधान्य

क्यूएस वर्ल्ड रँकिंग असो वा शैक्षणिक संस्थांच्या जागतिक स्तरावरील अन्य क्रमवारी असो या क्रमवारीत संबंधित शिक्षण संस्थेला संशोधनासाठी मिळणारा निधी, प्राध्यापकांनी सादर केलेले संशोधन पेपर/शोधनिबंध, सायटेशन, प्राध्यापक-विद्यार्थ्यांनी मिळविलेली पेटंट अशा निकषांना प्राधान्य देण्यात येते. मुळातच या क्रमवारीत 'सर्वोत्कृष्ट' असणारी विद्यापीठे खूप जुनी आहेत. त्या तुलनेत भारतातील विद्यापीठांची, शैक्षणिक संस्थांची निर्मितीही अलीकडील आहे. देशात केंद्रीय, सार्वजनिक विद्यापीठांसह सरकारचे अनुदान मिळणाऱ्या संस्था जागतिक स्पर्धेत त्यातल्या त्यात उच्चस्थानी आहेत. आजवर जागतिक स्तरावर मूलभूत विज्ञानातील संशोधन मोठ्या प्रमाणात झाले असून, संदर्भ म्हणून ते जगभरात वापरले जाते. म्हणूनच त्याला मिळणारी सायटेशनही अधिक आहेत. आपल्याकडे उपयोजित ज्ञानावर आधारित संशोधनांची संख्या अधिक आहेत. संशोधनाला मिळणारा निधी, प्राध्यापकांचे संशोधन, पेटंट याबाबत गेल्या काही दशकांपासून जागृती वाढली आहे. असे असले तरीही देशातील ज्ञानपरंपरेची आणि जागतिक स्तरावरील शिक्षणाची स्पर्धा होणे अशक्य आहे. विकसित भारताचे स्वप्न साकारताना उच्चदर्जाची प्रतिभासंपन्न पिढी घडविण्याची जबाबदारी आपली आहे, हे स्वीकारून शिक्षण संस्थांनी त्या दृष्टीने व्यवस्थेत बदल करणे, हेच महत्त्वाचे ठरेल.

## 'कृत्रिम बुद्धिमत्ता' नवे आव्हान

शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर याबाबत अनेकदा बोलले जाते. आजची तरुण पिढी ही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरात एक पाऊल पुढे आहे. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना 'एआय'चे शिक्षण देताना आणि 'एआय' वापराबाबत सांगताना, त्यांच्या पद्धतीने कुशलतेने हा विषय हाताळणे उपयुक्त ठरणार आहे. म्हणूनच प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यातील नातेसंबंध अधिक दृढ करून शिक्षण संस्थांमध्ये 'एआय'च्या वापराचे वेगळे प्रयोग होणे आवश्यक आहे. आता आपण एआय, डेटा सायन्स, मशिन लर्निंग शिक्षणात जागतिक पातळीवर होणाऱ्या नव्या बदलांचा वेग स्वीकारत अभ्यासक्रमात बदल करण्याच्या दृष्टीने पाऊल उचलणे हा शिक्षणातील नवा अध्याय ठरेल.

अवलोकन: उत्तर महाराष्ट्र